शैक्षणिक संदर्भ अंक १२३ एप्रिल-मे २०२०

# कोविड १९, लॉक डाऊन

# आणि आर्थिक परिणाम !

लेखक: गिरीश गोखले

# कोविड १९ , लॉक डाऊन आणि आर्थिक परिणाम !

**लेखक: गिरीश गोखले**

विषाणू जीवघेणे तर असतातच पण एरवी शक्तिमान समजल्या जाणाऱ्या आर्थिक सत्तासुद्धा त्यामुळे विकलांग होतात. जीवघेण्या (ज्यामध्ये एक लाखाहून अधिक लोकांचा जीव गेला) विषाणूंचा प्रादुर्भाव यापूर्वीही झाला आहे. त्यावर एक नजर टाकली असता खालील चित्र दिसते:

| घटना | साथीचा कालावधी | मृत्यूसंख्या |
|---|---|---|
| ब्लॅक डेथ | १३४७ ते १३५२ | ७५,०००,००० |
| इटालियन प्लेग | १६२३ ते १६३२ | २,८०,००० |
| सेविला प्लेग | १६४७ ते १६५२ | २०,००,००० |
| लंडन प्लेग | १६६५ ते १६६६ | १,००,००० |
| मारसेली प्लेग | १७२० ते १७२२ | १,००,००० |
| कॉलरा | १८१६ ते १८२० | १,००,००० |
| रशिया कॉलरा | १८५२ ते १८६० | १०,००,००० |

| | | |
|---|---|---|
| जागतिक फ्लू | १८८९ ते १८९० | १०,००,००० |
| स्पॅनिश फ्लू | १९१८ ते १९२० | १००,०००,००० |
| एशियन फ्लू | १९५७ ते १९५८ | २०,००,००० |
| हाँगकाँग फ्लू | १९६८ ते १९६९ | १०,००,००० |
| एच वन एन वन | २००९ ते २००९ | २,०३,००० |

सहाशे सातशे वर्षांपूर्वीच्या साथींमध्ये आणि आताच्या साथींमध्ये एक फरक जाणवतो. म्हणजे सहाशे-सातशे वर्षांपूर्वीचे समाजजीवन बऱ्याच अंशी जुन्या कल्पना, अंधश्रद्धा यांवर अवलंबून होते. सध्या आपल्याकडे प्रगत तंत्रज्ञान आणि चांगली आरोग्य व्यवस्था (निदान काही देशांत तरी) आहे, तशी पूर्वी नव्हती. त्यामुळे अशा जीवघेण्या साथी आटोक्यात आणण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजना खूपच बाळबोध होत्या किंवा अगदी नगण्य होत्या. बराचसा भार दैवावरच टाकलेला असे. परंतु आता अशी परिस्थिती नाही. साथीमुळे होणाऱ्या शारीरिक, मानसिक आणि आर्थिक परिणामांकडे सर्व जगाचे वेळीच लक्ष असून त्यानुसार उपाय अमलात आणले आहेत आणि पुढेही आणले जातील.

एक प्रश्न सर्वांना आज प्रकर्षाने भेडसावतो आहे तो म्हणजे ही साथ आटोक्यात आल्यानंतरचे आर्थिक चित्र कसे असेल आणि आपला त्यात निभाव लागेल का?

पूर्वी येऊन गेलेल्या साथींनंतरचे आर्थिक चित्र कसे होते त्यावरून आपल्याला काही बोध घेता येईल का याची तपासणी केली असता असे दिसते की, जागतिक फ्लू साथीनंतर

(१८८९ ते १८९०) रशियामध्ये १८९१ पर्यंत आर्थिक मंदीची लाट उसळली होती. तसेच जागतिक मंदीचा काळ (१९२०) जर बघितला तर त्याच्या आधी स्पॅनिश फ्लूची लागण मोठ्या प्रमाणावर झाली होती. अशीच उदाहरणे एशियन फ्लू आणि हॉंगकॉंग फ्लूच्या बाबतीत देता येतील. अर्थात प्रत्येक व्यापक साथीनंतर आर्थिक मंदीची लाट आली असे काही दिसत नाही. ज्या जीवघेण्या साथींमध्ये मोठ्या प्रमाणात जीवित हानी झाली, त्यानंतर आर्थिक मंदीला सुरुवात झाली असे दिसते.

कोविड १९ मुळे आत्तापर्यंत ३२ लाखापेक्षा अधिक लोक बाधित झाले आहेत, तर २.३ लाखापेक्षा अधिक मृत्युमुखी पडले आहेत (३० एप्रिल २०२० ची स्थिती) आणि अजूनही ही हानी दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे, कारण अजून साथ आटोक्यात आलेली नाही. त्यामुळे जेव्हा ही साथ आटोक्यात येऊ लागेल त्याच सुमारास आपल्याला आर्थिक, कदाचित जागतिक आर्थिक मंदीच्या झळा बसायची चिन्हे दिसू लागतील. आपल्या देशात कोविड १९ पूर्वीच आर्थिक मंदी ठाण मांडून बसली होती त्यामुळे आणखी गंभीर आर्थिक मंदीला आपल्याला तोंड द्यावे लागेल अशी चिन्हे आहेत.

## आर्थिक परिणाम काय असू शकतील ?

कोविड १९ ही संसर्गजन्य साथ असून तिच्यावर कोणतेही ठोस उपाय नाही.



चीनने कोविड १९ सर्व जगाला दिला आणि त्यावरचा उपाय लॉक डाऊन हाही सर्वांना दाखवला. सर्वांनी सर्व व्यवहार बंद करून आहे तिथे थांबणे आणि संसर्ग टाळणे, हाच मार्ग त्यामुळे सर्व देशांनी निवडला आहे. त्यामुळे न भूतो न भविष्यती अशी

परिस्थिती निर्माण झाली. सर्व धंदे व्यवसाय बंद झाले. आर्थिक व्यवहार ठप्प झाले. यातून फक्त जीवनावश्यक गोष्टींना सूट दिली गेली, जसे की भाजी, औषधे, किराणा इत्यादी. एरवी गर्दीने ओसंडून वाहणारे रस्ते सुनसान झाले. एक दिवस नाही तर अनेक दिवस - काही महिने. एवढी गंभीर वेळ येईल अशी कुणी कल्पनाच केली नव्हती. त्यामुळे त्यावर जशी परिस्थिती येईल अशी उपाययोजना केली गेली. भारत सरकारने पहिल्या सत्रामध्ये ज्या उपाययोजना जाहीर केल्या, त्यातील ठळक बाबी:

- एकूण उपाय योजनेची व्याप्ती ही १,७०,००० कोटी रूपये इतकी आहे.
- लॉक डाऊन मुळे ज्यांचे हातावर पोट आहे आणि जे आपल्या घरी परतू शकणार नाहीत असे मजूर अशांना दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला.
- ८० कोटी गरीब जनतेला पाच किलो तांदूळ किंवा गहू आणि एक किलो डाळ जाहीर  करण्यात आली.
- नैमित्तिक खर्चाकरता शेतकऱ्यांना प्रत्येकी दोन हजार रुपये त्यांच्या खात्यात जमा केले जातील.

परंतु वरील आणि इतर उपाययोजनांमुळे किती लोकांना आधार मिळाला, तो किती दिवस टिकेल, याबद्दल शंका आहे.

भारताने जाहीर केलेल्या उपाययोजनांची तुलना इतर प्रगत देशांशी केली गेली. अमेरिकेने त्यांच्या जीडीपीच्या दहा टक्के इतक्या उपाययोजनेची घोषणा केली. आपणही त्याचे अनुसरण करायला पाहिजे, असे काहींचे मत आहे.आपण केलेली उपाययोजना ही फारच तुटपुंजी आहे आणि आणखी अशाच आर्थिक उपाय योजना नजीकच्या काळात

अमलात आणाव्या लागतील. दोन महिने उद्योग ठप्प झाल्यामुळे पुढचे भीतीदायक चित्र डोळयासमोर येऊ लागले आहे.

- उलाढालीत घट व त्यामुळे नफ्यावर विपरीत परिणाम.
- विमान वाहतूक, बँकिंग, हॉटेल, बांधकाम व पर्यटन क्षेत्राचे प्रचंड नुकसान.
- जीडीपीमध्ये जेमतेम वाढीची शक्यता, कदाचित घट सुद्धा.
- क्रयशक्तीत मोठी घट व त्यामुळे अर्थव्यवस्था आकुंचन पावण्याचा धोका. (पहा चौकट : हेलिकॉप्टर मनी )
- मोठ्या प्रमाणात बेरोजगारी. बेरोजगारीचा दर मार्चमध्ये ८.४१ % वरून २२.३% इतका  झाला असून त्यात आणखी वाढ संभवते.
- शेअर बाजारात मोठी घसरण.

### *हेलिकॉप्टर मनी*

*क्रयशक्तीत होणारी घट, आकुंचन पावणारी अर्थव्यवस्था यातून निर्माण होणाऱ्या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी मिल्टन फ्रीडमन या अर्थतज्ञाने १९२० च्या जागतिक मंदीत हा शब्द प्रयोग वापरला.*

*हेलिकॉप्टर मनी म्हणजे अचानक होणारा धनलाभ. जणू आकाशातून होणारा धन वर्षाव.*

*रिझर्व बँक आणि सरकार यांच्या समन्वयाने लोकांकडे असलेल्या क्रयशक्तीत भरीव वाढ करायची. त्यामुळे क्रयशक्तीत ठोस वाढ होऊन अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. उदा. सध्या शेतकऱ्यांच्या खात्यात २००० जमा केले आहेत. त्या ऐवजी २०,००० जमा करणे. ही रक्कम परत फेडायची नसल्यामुळे त्याचा कोणताही ताण लाभार्थींवर येणार नाही पण क्रयशक्ती मात्र वाढेल.*

*हा उपाय अजून तरी कुणी अमलात आणल्याचे दिसत नाही.*

जागतिक अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर हा ‘उणे ३%’ इतका राहील असे भाकीत इंटरनॅशनल मोनेटरी फंडाने (आयएमएफ) केले आणि त्याच बरोबर १९२० पेक्षाही अधिक भयानक अशा आर्थिक मंदीचा इशारा दिला. भारताला रोज सुमारे ३५,००० कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान होत आहे, असा अंदाज आहे.

एकूणच आता आर्थिक व्यवहार अत्यंत मर्यादित आणि मोजून-मापून होतील. यातून परिस्थिती पूर्वपदावर यायला किमान एक ते दोन वर्षे लागतील असा अंदाज आहे.

लॉक डाऊन हा उपाय मनुष्य जीव वाचवण्यासाठी केलेला आहे हे जरी खरे असले तरी उपासमारीने आणि बेरोजगारीच्या मानसिक धक्क्याने सुद्धा जीवितहानी होऊ शकते. त्यामुळे लॉक डाऊन हा पर्याय मर्यादित स्वरूपात वापरला गेला पाहिजे आणि त्याबरोबरच आर्थिक गाडे सुरू ठेवले तर नक्कीच एवढे भयावह चित्र असणार नाही.

कोविड १९ सारख्या साथीची वेळीच (वेळ गेल्यानंतर नव्हे) सूचना मिळण्यासाठी सर्व देशांनी एकत्रित कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे. २००९ नंतरच्या स्वाइन फ्लूमुळे सावध होऊन अमेरिकेच्या त्यावेळच्या अध्यक्षांनी (बराक ओबामा) अशीच एक योजना कार्यान्वित केली होती. त्यामध्ये ४९ देशांमध्ये साथीच्या रोगांसाठी निदान आणि पडताळणी केंद्रे स्थापन केली होती. अशा साथींची सूचना वेळेवर मिळू शकेल आणि त्याचा प्रसार थांबवता येईल, हा त्यामागील उद्देश होता. परंतु ओबामानंतरच्या अध्यक्षांनी (डोनाल्ड ट्रम्प) ही केंद्रे बंद केली. आज जर ही यंत्रणा अस्तित्वात असती तर चित्र नक्कीच वेगळे दिसले असते.

यापुढे आपल्याला जागतिक युद्धेही विषाणूमार्फतच खेळली गेलेली दिसतील असा इशारा २०१५ साली बिल गेट्स यांनी दिला होता. त्यावर उपाय म्हणून आरोग्य व्यवस्था सक्षम करण्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करण्याची आवश्यकता त्यांनी मांडली होती.

भविष्यात अशा साथी जर आल्या तर लॉक डाऊन कमीत कमी ठेवून आर्थिक घडी न विस्कटता मानवी जीव वाचवायचे असतील, तर देशातील आरोग्य व्यवस्था सक्षम करणे हेच उद्दिष्ट ठेवले पाहिजे.

## वेगवेगळ्या क्षेत्रांवर लॉक डाऊनचा परिणाम काय होईल?

**बँकिंग:** कर्ज वाढी मध्ये घट.

कर्ज वसुली मध्ये घट.

अनुत्पादित कर्जामध्ये वाढ.

नफ्यामध्ये घसरण.

**पर्यटन**: सुमारे दीड ते दोन वर्ष परिणाम जाणवणार.

अवलंबून असलेले व्यवसाय धोक्यात.

प्रचंड तोट्याची शक्यता.

**विमान वाहतूक:** सुमारे दीड ते दोन वर्षे परिणाम जाणवणार.

प्रचंड तोटा सहन करावा लागणार.

**बांधकाम व्यवसाय:** आधीच मंदीच्या खाईत. चालू असलेले प्रकल्प रेंगाळणार.

कंत्राटी कामगारांचा तुटवडा  जाणवणार.

**उत्पादन क्षेत्र:** उलाढाली मध्ये सुमारे २० टक्के घट अपेक्षित.

खर्च कमी न होता  वाढणार.

नफ्यावर विपरीत परिणाम.

व्यवसाय वाढीचे बेत लांबणीवर.

**सेवा क्षेत्र:** मुळात सेवाक्षेत्र हे इतर क्षेत्रांवर अवलंबून असल्यामुळे नफ्यामध्ये २०% घटीची शक्यता.

**संघटित नोकरदार:** सरकारी नोकरदारांवर फारसा परिणाम नाही.

पगार कदाचित वेळेवर होणार नाहीत.

खाजगी नोकरदारांवर पगारकपातीची टांगती तलवार.

नोकरीच्या सुरक्षेची हमी कमी होणार.

**असंघटित नोकरदार:** लॉक डाऊनचा पगार गमावण्याची शक्यता.

पूर्ववत काम मिळण्यास विलंब.

**शेती व्यवसाय :** लॉक डाऊन मुळे तयार केलेल्या मालाला बाजारपेठ उपलब्ध न होणे.

शेतीसाठी घेतलेल्या कर्जाचा असह्य ताण.

शेतीमालाला अपेक्षित भाव न मिळणे.

शेतमजूर कामावर येण्याबाबत अनिश्चितता.

**आहे रे वर्ग:** पेन्शनमध्ये घटीची शक्यता नाही.

गुंतवणुकीवरील उत्पन्नात लक्षणीय घट.

एकूण उत्पन्नात सुमारे १५ ते २० टक्के घट अपेक्षित.

तरुण व मध्यमवयीन नागरिकांच्या छानछोकीला लगाम.

घर कर्जाच्या परतफेडीसाठी नव्याने जुळवाजुळव करावी लागणार.

नोकरीच्या सुरक्षेची हमी नसल्यामुळे ताण-तणाव वाढीस लागणार.

**नाही रे वर्ग:** सर्वात या वर्गाचे प्रचंड हाल होणार.

संपूर्णतः सरकारी/ खाजगी /धर्मादाय संस्था यावर अवलंबून रहावे लागणार.

आजचे भागले तरी उद्याची चिंता कायम.

पूर्वीप्रमाणे काम मिळेलच याची खात्री नाही.

सरकारी योजनेचा लाभ कागदावरच राहण्याची शक्यता.

**केंद्र /राज्य सरकार :** कराद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नात लक्षणीय घट.

कल्याणकारी योजनांवर प्रचंड खर्च.

तुटीचे प्रमाण प्रचंड वाढणार.

चलन वाढीची शक्यता.

जी डी पी मध्ये अपेक्षित वाढ न मिळता घटीची शक्यता.

असंतोषातून ठिकठिकाणी जनक्षोभाची शक्यता.

**शेअर बाजार:** जागतिक मंदीच्या शक्यतेने घसरण.

नवीन भांडवल उभारणीस खीळ बसणार.

नवीन/ व्यवसाय वाढीचे बेत पुढे ढकलावे लागणार.

जागतिक बाजारपेठेमध्ये पत मूल्यांकन घटणार.

विदेशी गुंतवणुकीमध्ये घट.

§§§

---

लेखक : **गिरीश गोखले**, अर्थतज्ञ व संदर्भ संस्थेचे विश्वस्त.

इमेल : girishvishnu@gmail.com